# मेट्रो-३ प्रवासात मोबाईल वापर बिनधास्त !

**मुंबई** : लोकल रेल्वेतून प्रवास करताना महत्त्वाच्या क्षणी कॉल कट होण्याचे प्रकार अनेकांच्या बाबतीत घडले असतील. नेटवर्क प्रॉब्लेममुळे आपल्याला समोरच्या व्यक्तीशी संवाद साधण्यात अडचणी येतात. मात्र मेट्रो-३ च्या प्रवासात प्रवाशांना मोबाईलवर बोलता यावे, यासाठी ४-जी आणि ५-जी यासारख्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने सौदी अरेबियामधील रियाध शहरात स्थित असलेल्या एसीईएस या कंपनीच्या इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या उपकंपनीसोबत मेट्रो मार्ग-३ करिता दूरसंचार पायाभूत सुविधा प्रदान करण्याच्या करारावर स्वाक्षरी केली. सौदी अरेबियातील रियाध शहरात आयोजित कार्यक्रमात करारावर ही स्वाक्षरी करण्यात आली.

## आता नो नेटवर्क इश्यू; प्रवाशांना मिळणार अखंडित मोबाईल सेवा

मुंबई मेट्रो मार्ग-३ साठी दूरसंचार पायाभूत सुविधा प्रदान करण्यासाठी एसीईएस इंडिया कंपनीसोबत करार करताना आनंद होत आहे. आता मेट्रो-३ च्या प्रवासादरम्यान अखंडित मोबाईल आणि इंटरनेट सेवा उपलब्ध होईल. एसीईएस ही जागतिक पातळीवरील अनुभव असलेली आघाडीची आंतरराष्ट्रीय न्यूट्रल डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी आहे. मेट्रो-३ च्या दरवर्षी ६२५ दशलक्षहून अधिक प्रवाशांना डिजिटल अनुभव देण्यासाठीची ही भागीदारी महत्त्वपूर्ण ठरेल, असे मत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी व्यक्त केले.

## २७ स्थानके, भूमगित स्थानकात इंटरनेट सेवा

साधारण १२ वर्षांसाठी करण्यात आलेल्या या करारामुळे ४जी व ५जी सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत मेट्रो-३ द्वारे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्यांच्या ३३.५ कि.मी. लांबीच्या प्रवासादरम्यान सर्व २७ स्थानकांवर, प्लॅटफॉर्मवर, भुयारी मार्गामध्ये अतिजलद व अखंडित मोबाईल व इंटरनेट सेवा मिळणार आहे.